


देगलूर : महाविद्यालयात 'स्वच्छ भारत मिशन'अंतर्गत शिबिर पार पडले. यावेळी उपस्थित विद्यार्थी व शिक्षक.

# 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत शिबिर

## देगलूर महाविद्यालयात राबविला उपक्रम

**देगलूर, ता.८ (बातमीदार)** : देगलूर महाविद्यालयात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे प्रास्ताविक ॲड. कल्पना कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हनून मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी दैनंदिन जीवनात स्वच्छतेचे खूप महत्त्व आहे. त्यांसाठी सर्वांनी 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत प्रशिक्षण शिबिरात सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

ग्रामीण टप्पा - २ अंतर्गत पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद व टेक्नोस्पर्ट रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट परभणी आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या मार्फत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, ग्रामस्तरीय भाग धारकांसाठी आयोजित करण्यात आलेले दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण पूर्ण झाले. या शिबिरात ग्राम स्तरावर कार्य करणाऱ्या आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, बचत गट प्रतिनिधी, सरपंच, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी इत्यादी घटकांनी या प्रशिक्षणाचा दोन दिवसात लाभ घेतलेला आहे. यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी साजीद शेख, स्वप्नील रणभीडकर, सुल्तान सय्यद व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.व्यंकट खंदकुरे व स्वयंसेवक आणि स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner